# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 12 November 2024

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

भारताला दहशतवाद, सायबर हल्ले आणि हायब्रीड वारफेर यासारख्या सुरक्षा आव्हांना सामोरं जावं लागत असल्याचं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी केलं आहे. राजनाथसिंह यांनी आज दिल्ली इथं सुरक्षा परिसंवादाला संबोधित केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकारनं मजबूत आणि स्वदेशी अशी संरक्षण प्रणाली विकसित केल्याचं राजनाथसिंह म्हणाले. राष्ट्रीय सुरक्षेवरील माहिती युद्धाच्या धोक्याचा सामना करण्यासाठी भारत सरकार कालानुरुप संरक्षण रणनीती वापरण्यास कटिबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

अंमलबजावणी संचालनालयानं आज झारखंड आणि पश्चिम बंगाल इथं धाडी टाकल्या. बांग्लादेशी घुसखोरीसंदर्भात मनी लाँड्रींग प्रकरणात ही कारवाई करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

झारखंडमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ४३ मतदारसंघांसाठी उद्या मतदान होणार आहे. राज्यभरात १५ हजार ३४४ मतदान केंद्रं उभारण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व्हावी यासाठी सुरक्षा दलाच्या दोनशेहून अधिक तुकड्या मतदान केंद्रांवर तैनात करण्यात आल्या आहेत.

****

केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघ आणि चेलाक्करा राखीव विधानसभा मतदार संघात उद्या पोटनिवडणूक होणार आहे. दोन्ही मतदारसंघात आज मतदान साहित्य वाटप करण्यात येत आहे. जुलै महिन्यात भूस्खलनामुळे बाधित झालेल्या मतदारांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत

दोन्ही जागा जिंकून रायबरेलीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राहुल गांधींनी राजीनामा दिल्यानंतर ही पोटनिवडणूक होत आहे.
बिहारमध्येही उद्या विधानसभेच्या चार जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. आसाममध्येही उद्या होणाऱ्या विधानसभेच्या पाच जागांसाठी पोटनिवडणुकीची तयारी पूर्ण झाली आहे.

****

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा शेवटचा आठवडा आहे. भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी थोड्याच वेळात चिमूर इथा सभा घेणार आहेत, त्यानंतर सोलापूर इथं साडेचार वाजता आणि पुण्यात सायंकाळी साडेसहा वाजता नरेंद्र मोदी यांची सभा होणार आहे.
भाजपनेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज मुंबईत घाटकोपर आणि कांदिवली पश्चिम इथं सभांना संबोधित करणार आहेत.
भाजपनेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची डहाणू इथं सभा सुरु आहे, त्यानंतर पालघर आणि रायगड जिल्ह्यात पेण इथं फडणवीस यांच्या जाहीरसभा होणार आहेत.
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची आज सोलापूर इथं सभा आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नाशिक जिल्ह्यात पाच सभा होणार आहेत.
काँग्रेस नेते राहुल गांधी हे गोंदिया मतदारसंघातल्या काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेणार आहेत. चिखली इथं होणारी राहुल गांधी यांची सभा रद्द करण्यात आली आहे.
शिवसेना नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर इथं नुकतीच प्रचारसभा झाली. अमरावती जिल्ह्यात सिट्रस इस्टेट उभं करण्यासाठी राज्य सरकारनं प्रोत्साहन दिल्याचं शिंदे म्हणाले.

****

विधानसभा निवडणुकीसाठी रत्नागिरीत आज टपाली मतदानाला सुरुवात झाली आहे. पोलीस, तसंच मतदान केंद्रावर कर्तव्य बजावणारे अधिकारी आणि कर्मचारी यांनी रत्नागिरी शहरातल्या दामले हायस्कूल मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला.

****

आज लोकसेवा प्रसारण दिन साजरा करण्यात येत आहे. १९४७ मध्ये महात्मा गांधी यांनी यादिवशी आकाशवाणी स्टुडिओला भेट दिली होती. त्यांनी फाळणीनंतर हरियाणातील कुरुक्षेत्र इथं तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये थांबलेल्या नागरिकांना आकाशवाणीच्या माध्यमातून संबोधित केलं होतं. आज दिल्ली इथं आकाशवाणी मुख्यालयात यानिमित्त विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

****

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुबईहून आलेल्या एका प्रवाशाकडून २ कोटी २७ लाख रुपये किमतीचं तीन किलो सोनं काल जप्त करण्यात आलं. सीमाशुल्क कायद्यानुसार या प्रवाशाला अटक करण्यात आली.

****

संत शिरोमणी नामदेव यांच्या ७५४ व्या जन्म सोहळ्यानिमित्त त्यांचे जन्मस्थान असलेल्या हिंगोली जिल्ह्यातल्या नर्सी नामदेव इथं आज ५००१ पणत्या लावून दीपोत्सव साजरा करण्यात आला. नर्सी नामदेव इथं पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांनी रांगा लावल्या. भाविकांमधून अशोक घोंगडे आणि वंदना घोंगडे या दांपत्यास नामदेवाच्या वस्त्र समाधीची महापूजा करण्याचा मान मिळाला.

****

गेल्या आठवड्यापासून सोने आणि चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळत आहे. आज २४ कॅरेट सोन्याचा दहा ग्रॅमसाठी दर ७५ हजारांच्या आसपास आहे. तर चांदीचा दर ९४ हजारांवरुन आता ८९ हजारांवर येऊन स्थिरावला आहे. दरम्यान, शेअर बाजाराची आज चांगली सुरुवात झाली. सेन्सेक्समध्ये १४८ अंकांची वाढ होऊन ७९ हजार ६४४ अंकांवर स्थिरावला, तर निफ्टी ८४ अंकांनी वाढून २४ हजार २२५ अंकांवर स्थिरावला.

****

बुद्धिबळात ग्रँड मास्टर अरविंद चिथंबरमनं अमेरिकन ग्रँड मास्टर लेव्हॉन अरोनियनचा एका अत्यंत चुरशीच्या लढतीत पराभव करून चेन्नई ग्रँड मास्टर्सचं विजेतेपद पटकावलं. तर, स्पर्धेत एकही लढत गमावली नसलेल्या ग्रँडमास्टर वी प्रणवला चॅलेंजर्स पुरस्कार मिळाला आहे.

****